मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » शुक्रवार, दि. 16 ऑगस्ट 2024 | पान- 1

# रुग्णालयांची 'फायर एनओसी' प्रक्रिया होणार सुलभ..!

## आयुक्त शेखर सिंह यांचे डॉक्टर संघटनांना आश्वासन : आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने महत्वपूर्ण बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील वैद्यकीय क्षेत्रात व्यावसाय करणाऱ्या डॉक्टर आणि रुग्णालयांना भेडसावणाऱ्या प्रशासकीय अडचणी व समस्यांबाबत महानगरपालिका प्रशासन सकारात्मक कार्यवाही करेल. तसेच, फायर ऑडीट एनओसी, बायोमेडिकल वेस्ट आणि हॉस्पिटल रजिस्ट्रेशन प्रक्रिया सुलभ करण्यात येईल, असे अश्वासन महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिले.

भोसरी विधानसभा मतदार संघातील भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संघटना आणि प्रतिनिधी यांची महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, वैद्यकीय विभागाचे लक्ष्मण गोफणे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक ऑटो क्लस्टर येथे घेण्यात आली.

यावेळी आयुर्वेद संघटनेचे वैद्य निलेश लोंढे, पिंपरी-चिंचवड निमाचे अध्यक्ष डॉ. प्रताप सोमवंशी, सत्यजित पाटील, विमा पिंपरी-चिंचवडचे सेक्रेटरी संगीता गायकवाड, पिंपरी-चिंचवड प्रायव्हेट हॉस्पिटल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. गणेश भोईर, आयुर्वेद फोरम निमाचे अध्यक्ष डॉ. अर्चना गोरे, 'एफडीीए' चे डॉ. खेमचंद सरडे, भोसरी डॉक्टर्स असोसिएशनचे डॉ. चंद्रकांत राऊत, दिघी डॉक्टर्स असोसिएशन अध्यक्ष डॉ. महेश भारती, खजिनदार डॉ. दिपक शेलार, मोशी डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अमृत पेरणे, डेंटल असोसिएशनचे डॉ. अतुल पाटील आदी उपस्थित होते.



### शहरात आता आयुर्वेद व पंचकर्म रुग्णालय..

» पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून शहरात आयुर्वेद व पंचकर्म रुग्णालय सुरू करावे, अशी सूचना आमदार महेश लांडगे यांनी केली. त्याला सकारात्मक प्रतिसाद देत महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी वैद्यकीय विभागाने जागेची चाचपणी करावी. त्यानुसार प्रस्ताव तयार करावा, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. विशेष म्हणजे, प्रशासनाने समाविष्ट गावांमध्ये सदर रुग्णालय सुरू करावे, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी बैठकीत केली आहे.

### बैठकीत चर्चा झालेले महत्त्वपूर्ण विषय..

» रुग्णालयालयांना फायर ऑडीट एनओसी खासगी संस्थांकडून बी-फॉर्मद्वारे हॉस्पिटल रजिस्टेशन करण्याची प्रक्रिया सुलभ होईल.

» बायोमेडिकल वेस्टसाठी ३ वर्षांचे शुल्क भरल्यावर पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर सवलत मिळण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

» हॉस्पिटलचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन सबमिट केल्यानंतर त्याची ॲकनॉलेजमेंट देण्यात येईल. त्यामुळे इन्शुरन्सचे काम अडून राहणार नाही. हॉस्पिटल रजिस्टेशन प्रक्रिया सुलभ व जलद करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.


> पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. महानगरपालिका रुग्णालयांमध्ये सक्षमपणे आरोग्य सुविधा देण्यासाठी प्रशासन सतर्क आहे. पण, खासगी डॉक्टर आणि वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था, संघटना यांचेही शहराचे नागरी आरोग्य संवर्धन करण्यात महत्त्वपूर्ण योगदान आहे. वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना येणाऱ्या समस्या तातडीने सोडवण्याबाबत प्रशासनाला सूचना केली आहे. शहरात आता आयुर्वेद रुग्णालय व पंचकर्म सेंटर उभारले जात आहे, ही बाब स्वागतार्ह आहे.
>
> - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पिंपरी चिंचवड शहरात डेंग्यूच्या रुग्णांची संख्या 67 रुग्ण तर झिकाचे 5 रुग्ण

## शहरात आत्तापर्यंत 67 रुग्णांना डेंग्यूची लागण झाली आहे. 8 जणांना चिकुनगुनिया, तर 5 जणांना झिकाची लक्षणे आढळून आली आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात डेंग्यूच्या रुग्णांचीसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहरात आत्तापर्यंत 67 रुग्णांना डेंग्यूची लागण झाली आहे. 8 जणांना चिकुनगुनिया, तर 5 जणांना झिकाची लक्षणे आढळून आली आहेत. यामध्ये 3 गर्भवती महिलांचा समावेश आहे. डेंग्यू, चिकुनगुनिया आणि झिका नियंत्रणासाठी महापालिकेच्या आरोग्य आणि




वैद्यकीय विभागाच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. डेंग्यू मुक्त शहर अभियान राबविण्यात येत आहे. डासोत्पतीस कारणीभूत ठरणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. डासोत्पतीची ठिकाणे नष्ट करून औषध टाकण्यात येत आहे. शहरात सध्य:स्थितीत 67 जणांना डेंग्यू, 8 जणांना चिकुनगुनिया, तर 5 जणांना झिकाची लक्षणे आढळून आली आहेत. यामध्ये 3 गर्भवती महिलांचा समावेश आहे. या तीनही रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याने त्यांना घरी सोडण्यात आले आहे. तसेच गर्भवती महिलांना झिका व डेंग्यु या आजाराची ताप, सांधेदुखी, डोळयांच्या मागे दुखणे आदी लक्षणे आढळल्यास त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय विभागाचे अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी केले आहे.

# संशयित दहशतवाद्यांवरून शहरभर खळबळ

**मंगळवार पेठेतील महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात दहशतवादी शिरल्याची अफवा पसरल्याने शहरात दिवसभर खळबळ उडाली.**

**पुणे | प्रतिनिधी**

मंगळवार पेठेतील महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात दहशतवादी शिरल्याची अफवा पसरल्याने शहरात दिवसभर खळबळ उडाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तिघा संशयितांना ताब्यात घेतले असून आहे.

ते तिघेही बिहारचे असल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात पोलीस अधिक चौकशी करत आहे. स्वातंत्र्यदिनाच्या आदल्या दिवशीच हा प्रकार समोर आल्याने तपासचक्रे वेगाने फिरवली जात आहेत.

स्थानिक पोलीस आणि काही सामाजिक संस्थांनी मंगळवारी (दि.१३) कमला नेहरू रुग्णालय प्रशासनाला व्हॉट्स ॲपवरून मेसेज आणि फोटो पाठवून रुग्णायालयत संशयित बांगलादेशी फिरत असल्याचे कळवले होते.

त्यानुसार रुग्णालय प्रशासनाने सीसीटीव्ही फुटेज सर्व सुरक्षा रक्षकांना आणि कर्मचाऱ्यांना पाठविले होते. बुधवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास सीसीटीव्ही फुटेजमधील संशियत आणि रुग्णालयात आलेल्या तिघांमध्ये साम्य दिसत होते.

यामुळे रुग्णालयातील नर्स आणि डॉक्टरांनी ही गोष्ट सुरक्षा रक्षकांनी कळवली. यानंतर या तिघांना लगेच एका खोलीत बसवून दार लावून घेण्यात आले. यावेळी त्यांना अनेक प्रश्न सुरक्षा रक्षकांकडून विचारण्यात आले. दरम्यान ही घटना पोलिसांनी कळविण्यात आली. यातच कमला नेहरू रुग्णालयात दहशतवादी शिरल्याचे अफवा सर्वत्र पसरली.

रुग्णालयाच्या तळघराच्या वरच्या मजल्यावर तपासणीचे ओपीडी पेपर काढण्यासाठी, एक्स-रे, इतर चाचण्यांसाठी मोठ्या प्रमाणात रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक थांबले होते. या भागात संशयित दहशतवादी असल्याचे समजताच एकच खळबळ उडाली होती.

रुग्णालयातील सगळ्या रुग्ण आणि कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यात आले होते. थोड्या वेळातच पोलीस दाखल झाले आणि त्यांनी तिघा संशयितांना घेतले. यानंतर तिघांना फरासखाना पोलीस ठाण्यात चौकशीसाठी नेण्यात आले होते.

हे तिघेही सध्या लोहियानगरमध्ये वास्तव्यास असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी घटनास्थळी भेट दिली.



### पोलिसांकडून सखोल तपास

» पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल म्हणाले, पोलिसांनी घटनास्थळी जाऊन संशयितांची चौकशी केली. त्यांच्याकडील आधारकार्ड आणि इतर कागपत्रांचे पडताळणी करण्यात येत आहे. त्यांच्या आधार कार्डवरील पत्याचा तपास केला जात आहे. ते किती दिवसांपासून पुणे शहरात आहेत आणि कुठल्या कामासाठी आले होते, याची सुद्धा चौकशी केली जात आहे. बिहारमधील तपास यंत्रणांशी पुणे पोलीस संपर्कात आहेत. त्यांच्याजवळ असणाऱ्या बॅगमध्ये कागदपत्रे आढळून आली आहेत. प्राथमिक तपासात ते एका संस्थेसाठी वर्गणी गोळा करायला आल्याचे समजते. यासंदर्भात अधिक माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे

### फुटेज आणि संशयितांत साम्य

» याबाबत बोलतांना कमला नेहरू रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रशांत बोटे यांनी सांगितले की, दि. १३ ऑगस्टच्या सकाळी हे संशयित तिघे रुग्णालयात आले होते. त्यांनी फॉर्म भरून रक्तचाचणी केली होती. त्यानंतर ते निघून गेले. दरम्यान, रात्री साडेआठ वाजता स्थानिक पोलिसांनी काही फोटो पाठवून "संशयित बांगलादेशी रुग्णालय परिसरात फिरत असून या संदर्भात काही समजल्यास पोलिसांना कळवावे,' असे सांगितले होते.

### रक्त तपासणीचा अहवाल

» सीसीटीव्ही तपासण्यात आले. पोलिसांनी पाठविलेले फोटो आणि सीसीटीव्हीतील संशयित यांच्यात साम्य होते. यामुळे फोटो आणि फुटेज कर्मचाऱ्यांना पाठविण्यात आले. या तिघा संशयितांची सर्व माहिती घेण्यात आली. बुधवारी त्यांच्या रक्त तपासणीचा अहवाल देण्यात येणार होता. दरम्यान, बुधवारी सकाळी तिघेही रुग्णालयात आले. ही माहिती पोलिसांना देण्यात आली.

# मिरवणुकीत 'लेझर' प्रकाशझोतांवर बंदी पोलीस आयुक्तांचा निर्णय

**पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी विसर्जन मिरवणुकीत लेझर प्रकाशझोतांचा वापर करण्यास बंदी घातली आहे**

**पुणे | प्रतिनिधी**

वैभवशाली विसर्जन परंपरा असलेल्या पुण्यातील विसर्जन मिरवणुकीत गेल्या काही वर्षांपासून डोळे दिपवणाऱ्या प्रकाशझोतांचा (लेझर बीम) वापर करण्यात येत आहे. लेझर प्रकाशझोतांमुळे डोळ्यांना इजा पोहोचल्याची घटना गेल्या वर्षी घडली होती.

या पार्श्वभूमीवर पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी विसर्जन मिरवणुकीत लेझर प्रकाशझोतांचा वापर करण्यास बंदी घातली आहे. अन्यथा कारवाईचा इशाराही दिला आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस मुख्यालयात शहरातील सार्वजनिक मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीनंतर पोलीस आयुक्तांनी पत्रकारांशी संवाद साधला. गेल्या विसर्जन मिरवणुकीत लेझर प्रकाशझोतांचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात आला होता. त्यामुळे अनेकांना त्रास झाला. काहींच्या डोळ्यांना इजा झाली.

ध्वनिवर्धकाचाही वापर मोठ्या प्रमाणावर झाल्याच्या तक्रारी झाल्या होत्या. त्यानुसार लेझर प्रकाशझोतांवर बंदी घालण्यात आली आहे. मिरवणुकीतील ध्वनिवर्धकांच्या वापराबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या पालन करणे गरजेचे आहे.

ध्वनीवर्धक पुरवठादार व्यावसायिकांशी चर्चा करण्यात येणार आहे. लवकरच ध्वनी यंत्रणा सांभाळणाऱ्या (डीजे) तंत्रज्ञांचीही बैठक आयेजित करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

उत्सवाच्या कालावधीत पुणे शहरात दहा दिवस मद्यविक्री करण्यास बंदी घालण्यात यावी, अशी सूचना मंडळांच्या कार्यकर्त्यांनी केल्या होत्या. मद्य विक्रीची दुकाने दहा दिवस बंद ठेवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करत असल्याचे पोलीस आयुक्तांनी या वेळी स्पष्ट केले.



### मानाच्या मंडळांची पसंती ढोल पथकांना

» मानाच्या मंडळांनी विसर्जन मिरवणुकीत ढोल- ताशा पथकांनाच पसंती दिली आहे. मानाची मंडळे मिरवणुकीत ध्वनिवर्धकांचा वापर करत नाहीत. पारंपरिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात येते. बँड, ढोल पथकांचा समावेश मिरवणुकीत असतो, असे मानाच्या मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले.

### उत्सव काळात वाहतुकीचे नियोजन

» शहराच्या मध्य भागात उत्सवाच्या काळात भाविकांची मोठी गर्दी होत असते. फरासखाना- विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाहतूक समस्या, वाहनांसाठी जागा (पार्किंग) याबाबत मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी सूचना केल्या आहेत. चोरीच्या घटना रोखणे, वाहतूक समस्या, तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यांबाबत पोलिसांनी आतापासून तयारी सुरू केली आहे, असे आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.

# शंकर जगताप यांच्या पाठपुराव्यामुळे पीएमपी बसपासमध्ये 75 टक्के सवलत मिळणार

**पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीच्या हद्दीत कोणत्याही शाळेत जाण्यासाठी पीएमपीएमएलमार्फत सवलतीचा पास देण्यात यावा, अशी मागणी केली होती.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील शालेय विद्यार्थ्यांना पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीच्या हद्दीत कोणत्याही शाळेत जाण्यासाठी पीएमपीएमएलमार्फत सवलतीचा पास देण्यात यावा, अशी मागणी भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे केली होती. त्याची दखल घेत महापालिका प्रशासनाने आपल्या हद्दीतील पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना बसपासमध्ये ७५ टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. आता विद्यार्थ्यांनी बसपाससाठी केवळ २५ टक्के रक्कम भरावयाची आहे. भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील हजारो विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.



> पीएमपीएमएल ही पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी निर्माण करण्यात आलेली संस्था आहे. या संस्थेवर पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही महापालिका संयुक्तपणे खर्च करत आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका पीएमपीएमएलला दरवर्षी संचलन तुटीपोटी कोट्यवधी रुपये अनुदान देत आहे. असे असताना या दोन्ही शहरातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सवलतीच्या पासच्या लाभाबाबत पुणे महापालिका हद्दीतील विद्यार्थ्यांसाठी वेगळा नियम आणि पिंपरी-चिंचवड शहरातील विद्यार्थ्यांसाठी वेगळा नियम करणे म्हणजे पिंपरी-चिंचवडमधील विद्यार्थ्यांवर अन्याय करण्यासारखेच होते. पिंपरी-चिंचवड शहरातील विद्यार्थ्यांनाही आपल्या महापालिका हद्दीबाहेर शिक्षण घेण्यासाठी सवलतीचा बसपास मिळावा यासाठी मी सातत्याने पाठपुरावा केला. त्याची दखल घेऊन महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सर्वसामान्य कुटुंबातील शालेय विद्यार्थ्यांना पीएमपीएमएल बसपासमध्ये ७५ टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला याचा मला आनंद आहे.
>
> - शंकर जगताप - शहराध्यक्ष पिंपरी-चिंचवड भाजपा

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएमपीएमएलमार्फत सवलतीचा प्रवासी पास दिला जातो. त्याचा या शहरातील शेकडो विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षणासाठी वापर करता येत आहे. मात्र या सवलतीच्या पासचा लाभ केवळ पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीपुरताच विद्यार्थ्यांना घेता येत होता. हा नियम पिंपरी-चिंचवडमधील विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा होता. दुसरीकडे पुणे महापालिका हद्दीतील विद्यार्थ्यांसाठी मात्र वेगळा नियम केला गेला आहे. पुणे महापालिका हद्दीतील विद्यार्थ्यांना पीएमपीएमएलमार्फत देण्यात येणाऱ्या सवलतीच्या पासचा वापर पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीए या तीनही नियोजन संस्थांच्या हद्दीत करण्याचा नियम आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील विद्यार्थ्यांना केवळ आपल्याच महापालिका हद्दीत सवलतीच्या पासचा लाभ घेण्याची सक्ती करण्यात आली होती.

ही बाब लक्षात आल्यानंतर भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि पीएमपीएमएलच्या व्यवस्थापकीय संचालकांना पत्र पाठवून पिंपरी-चिंचवड शहरातील शालेय विद्यार्थ्यांवर पीएमपीएमएलच्या सवलतीच्या बसपास संदर्भात होणारा अन्याय दूर करण्यास सांगितले. या शहरातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सवलतीच्या पासचा लाभ पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीए या तीनही नियोजन संस्थांच्या हद्दीत घेता यावा यासाठी नियमात बदल करण्यात यावा. या बदललेल्या नियमाची चालू शैक्षणिक वर्षापासूनच अंमलबजावणी सुरू करून पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील विद्यार्थ्यांना पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीच्या हद्दीत कोणत्याही शाळेत जाण्यासाठी पीएमपीएमएलमार्फत सवलतीचा पास देण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली होती.

त्याची दखल घेत ६ ऑगस्ट रोजी झालेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील पाचवी ते दहावीपर्यंत विद्यार्थ्यांना पुणे महापालिका आणि पीएमआरडीएच्या हद्दीतील कोणत्याही शाळेत जाण्यासाठी बसपासमध्ये ७५ टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या चालू शैक्षणिक वर्षापासूनच अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील विद्यार्थ्यांना आता केवळ २५ टक्के रक्कम भरून पीएमपीएमएलचा सवलतीचा पास उपलब्ध होईल. या निर्णयाचा शहरातील सर्वसामान्य कुटुंबातील हजारो विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण

**भारताचा 78 वा स्वातंत्र्य दिन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने मध्यवर्ती कार्यालय, खराळवाडी, पिंपरी येथे साजरा करण्यात आला.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने मध्यवर्ती कार्यालय, खराळवाडी, पिंपरी येथे साजरा करण्यात आला. यावेळी सर्व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आमदार अण्णा बनसोडे म्हणाले की, भारत देश हा सर्वात मोठा शेती प्रधान व लोकशाही मानणारा देश आहे. भारत देशात अनेक धर्मांचे, अनेक भाषा बोलणारे लोक एकत्र राहतात व एकमेकांच्या संस्कृतीचा आदर करतात. स्वातंत्र्यानंतर देशाने विविध क्षेत्रांत प्रगती केली असून शिक्षण क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केली आहे. आपण सर्वांनी देशासाठी बलीदान देणाऱ्या सैनिकांना व विविध क्षेत्रात देशासाठी योगदान देण्याऱ्या महामानवाचे नेहमी स्मरण करावे, तसेच स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. ध्वजारोहन झाल्यानंतर सर्वांना संविधान प्रत देवून संविधानाचे सामुदायिकरित्या वाचन करण्यात आले.




यावेळी महिला अध्यक्षा कविता आल्हाट, , माजी उपमहापौर राजू मिसाळ, मोहम्मद पानसरे, युवक अध्यक्ष शेखर काटे, चिंचवड विधानसभा संघटक सतीश दरेकर, भोसरी विधानसभा संघटक प्रकाश सोमवंशी, ओबीसी सेल अध्यक्ष विजय लोखंडे, युवती अध्यक्षा वर्षा जगताप, ज्ञानेश्वर कांबळे, सेवादल सेल अध्यक्ष महेश झपके, सामाजिक न्याय अध्यक्ष संजय औसरमल, झोपडपट्टी सेल अध्यक्ष संतोष निसर्गंध, महिला कार्याध्यक्षा कविता खराडे, माजी नगरसेवक संतोष बारणे, शमीम पठान, गोरक्ष लोखंडे, निलेश पांढारकर, गोरक्ष पाषाणकर, लता ओव्हाळ, दीपक साकोरे, व्यवस्थापन सेल अध्यक्ष अकबर मुल्ला, अल्पसंख्यांक सेल अध्यक्ष युसूफ कुरेशी, ज्ञानेश्वर कांबळे, ॲड सचिन औटे, पदवीधर अध्यक्ष प्रदीप आवटी, अक्षय माच्छरे, शकुल्ला पठाण, उपाध्यक्ष गोरोबा गुजर, तुकाराम बजबळकर, विजय दळवी, संपत पाचुंदकर, मनिष शेडगे, सतीश चोरमले, निखिल सिंह, निखिल घाडगे, स्वराज शिंदे, भाग्यश्री म्हस्के, कुमार कांबळे, रविंद्र ओव्हाळ, माऊली मोरे, रशीद सय्यद, प्रशांत महाजन, विक्रम पवार, रमजान सय्यद, रामकृष्ण माने, रवींद्र सोनवणे,सचिन वाल्हेकर, शहाजी आत्तार, हाजी गुलाम रसुल, आशिर शेख, अविनाश सोनवणे, रमेश कांबळे, रामप्रभु नखाते, प्रदीप गायकवाड, नवनाथ डफळ, शोभा पगारे, आशा शिंदे, वंदना कांबळे, मिरा कांबळे, रिजवाना सय्यद, देवी थोरात, सुनंदा काटे, माधवी सोनार, रतन जगताप, जयश्री लांडगे, भरत थोरात, अर्चना लोहार, योगेश सागरे, शुभम भुजबळ, बाळासाहेब चौधरी, सुनील अडागळे, कार्यालयीन संपर्क प्रमुख धनाजी तांबे इत्यादींसह मान्यवरांसह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पाणीपुरवठा प्रमाणपत्र बंधनकारक पाणी असेल तरच बांधकामास परवानगी

## महापालिका, नगरपालिका अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून निश्चित पाणी मिळणार असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असल्याचे प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत बांधकाम परवानगी देताना बांधकाम व्यावसायिकांनी महापालिका, नगरपालिका अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून निश्चित पाणी मिळणार असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असल्याचे प्राधिकरणाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे,

तसेच ग्रामपंचायतींनी पाणीपुरवठा करण्याचे प्रमाणपत्र दिले, तर त्याची शहानिशा करूनच बांधकाम परवानगी देणार असल्याचे पीएमआरडीएने परिपत्रकात म्हटले आहे. या निर्णयामुळे पाण्याची व्यवस्था पाहूनच बांधकाम परवानगीसाठीचे प्रस्ताव दाखल करावे लागणार आहे.

पीएमआरडीए हद्दीतील बांधकामांना परवानगी देताना अथवा पूर्ण झालेल्या बांधकामांना भोगवटापत्र देताना संबंधित इमारतींना महापालिका अथवा सक्षम प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचे हमीपत्र घ्यावे, असे बंधन घालणारे परिपत्रक आयुक्तांनी मागील महिन्यात काढले.

यामध्ये प्राधिकरण क्षेत्रात युडीसीपीआर नियमावलीतील कलम २७.२ चे संदर्भ देत हे बंधन घातले. ज्या विकसकांनी असे प्रमाणपत्र दिले आहे; परंतु प्रत्यक्षात त्या गृहप्रकल्पांना पाणी पुरवठा केला जात नसेल, तर त्यांच्या परवानगी रद्द करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

यामुळे बांधकाम क्षेत्रात उलट-सुलट चर्चा सुरू झाली होती. आता प्राधिकरणाने पुन्हा एक परिपत्रक जारी करून बांधकाम परवाना, तसेच भोगवटा प्रमाणपत्रासाठी पाण्याची व्यवस्था असल्याचे खात्री पटल्यावरच या परवानग्या देणार असल्याचे ठणकावून सांगितले आहे.

प्राधिकरणाच्या हद्दीत सुमारे 814 गावांचा समावेश होतो. या गावांतून बांधकाम परवानगी अथवा भोगवटा प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव प्राप्त येतात. त्या वेळी बांधकाम व्यावसायिकांकडून ग्रामपंचायतीमार्फत पाणीपुरवठा करणार असल्याचे प्रमाणपत्र दिले जाते.



### म्हणून घेतला पीएमआरडीएने हा निर्णय

» ग्रामपंचायत अथवा इतर प्राधिकरणाने पाणीपुरवठा न केल्यास स्वखर्चाने तो करू, अशा आशयाचे हमीपत्र दिले जाते. बऱ्याच प्रकरणांत ग्रामपंचायत व विकासक यांच्याकडून पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याने अडचणी येत असल्याच्या तक्रारी नागरिक, तसेच लोकप्रतिनिधींनी प्राधिकरणाकडे केल्या होता. त्यामुळे पीएमआरडीएने हा निर्णय घेतला.

### बांधकाम व्यावसायिकांचे म्हणणे

» युडीसीपीआरमध्ये असे कोणतेही बंधन आलेले नाही. तसेच परवानगी देताना वॉटर लाइन डेव्हलपमेन्ट चार्जेससह जमीन विकसन शुल्क, फायर प्रीमिअम, एसटीपी प्लँट चार्जेस, पर्यावरण नाहरकत प्रमाणपत्र आणि शुल्क भरून मगच कार्यवाही होते. जर पाणी, ड्रेनेजची व्यवस्था प्राधिकरण पुरवू शकत नसेल, तर मग हे शुल्क आकारू नये जेव्हा या सुविधा पुरविल्या जातील, तेव्हा हे शुल्क वसूल करावे. केवळ शुल्क भरून घेणार अन् सुविधा द्यायच्या वेळी बांधकाम व्यावसायिकांवर जबाबदारी टाकणार, हा कुठला न्याय आहे, अशा शब्दांत बांधकाम व्यावसायिकांनी आपले म्हणणे मांडले आहे..

### परवानगी रद्द करण्याच्या सूचना

» यामध्ये प्राधिकरण क्षेत्रात युडीसीपीआर नियमावलीतील कलम २७.२ चे संदर्भ देत हे बंधन घातले. ज्या विकसकांनी असे प्रमाणपत्र दिले आहे; परंतु प्रत्यक्षात त्या गृहप्रकल्पांना पाणी पुरवठा केला जात नसेल, तर त्यांच्या परवानगी रद्द करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

# मिनी विधानसभेची तळतळ कोणाला भोवणार?

## सध्या लोकसभेनंतर विधानसभेचे वारे वाहू लागले आहे; परंतु जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांचा कोणी विचारच करायला तयार नाही

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या लोकसभेनंतर विधानसभेचे वारे वाहू लागले आहे; परंतु जिल्हा परिषद व पंचायत समिती (मिनी विधानसभा)च्या निवडणुकांचा कोणी विचारच करायला तयार नाही की या निवडणुका मुद्दाम होऊ दिल्या जात नाही, असा प्रश्न इच्छुकांना पडला आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांचा कालावधी संपून अनेक दिवस झाले आहेत; परंतु या न त्या कारणाने या निवडणुका आजपर्यंत पुढे ढकलल्या गेल्या आहेत. खरच तशी परिस्थिती आहे,की यामध्ये काही राजकीय गणिते आहेत हे देखील नागरिकांना समजेनासे झाले आहे.

परंतु या सगळ्या घोळामुळे इच्छुक मात्र मेटाकुटीला आहे आहेत. आज घडीला 26 जिल्हा परिषदा आणि 284 पंचायत समित्या अस्तित्वात आहेत.

तरी अजून निवडणुकांचा काही निर्णय झालेला नाही. एवढा कालावधी म्हणजे खूप मोठा कालावधी आहे. जवळजवळ अडीच वर्षे गेलेली आहेत. याला जबाबदारी कोण? आयोग, सरकार की आरक्षण? वरील कारणांबरोबर इतर ही अनेक कारणे आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समित्या या नागरिकांच्या रोजच्या व्यवहाराशी संबंधित असतात, त्यामुळे या संस्था जिवंत ठेवणे गरजेचे असते; परंतु राजकीय बट्ट्याबोळामुळे या संस्थांचे अस्तित्वच संपण्याच्या मार्गावर आहे.

वरील पैकी कोणतेही कारण आसले तरी अडचण होते ती इच्छुक कार्यकर्त्यांची. स्थानिक स्वराज्य संस्थांचा कालावधी संपण्याच्या अगोदर दोनवर्षांपासून अनेक इच्छुकांनी तयारी सुरू केलेली आहे.

म्हणजे साधारणपणे गेली पाच वर्षे हे इच्छुक तयारी करत आहेत ज्या नेत्याच्या मागे पुढे करून जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य होण्यासाठी तिकीट मिळविण्यासाठी पैसा खर्च केला,

नेत्याचा प्रचार केला, कार्यकर्ते सांभाळले त्या नेत्याची विधानसभेची दुसरी टर्म येण्याची वेळ झाली तरी इच्छुक हे इच्छुकच राहिले. ही वस्तुस्थिती भयंकर आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली आहे.




### दुधाची तहान ताकावर

» जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी अनेक जण इच्छुक होते; परंतु जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांचा काही मेळ लागण्या सारखा दिसना म्हणून काहींनी पर्याय म्हणून मध्यतरी झालेल्या बाजार समितीच्या निवडणुकांमध्ये आपले वजन वापरुन सहकारात का होइना, तालुका पातळीवरील नेता होण्याची आपली इच्छा पूर्ण करून दुधाची तहान ताकावर भागवली आहे.